॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रेड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२८ वा | शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# विधान परिषद निवडणुकीची घोषणा

## १२ मे रोजी मतदान, ९ जागांवर रंगणार लढत

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला असून राज्यातील ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. विशेष म्हणजे, त्याच दिवशी मतमोजणी होऊन निकालही जाहीर केला जाणार असल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे.



**कार्यकाळ संपणाऱ्या सदस्यांची पार्श्वभूमी**

विधान परिषदेतील ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. या सदस्यांमध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, श्रीकांत शिंदे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, गोपीचंद पडळकर, रजनीसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रविण डाके आणि रमेश कराड यांचा समावेश आहे. त्यामुळे या सर्व जागांसाठी नवीन सदस्यांची निवड होणार आहे.

**जागांचे संभाव्य राजकीय समीकरण**

सध्याच्या विधानसभा संख्याबळावर नजर टाकल्यास या निवडणुकीत महायुतीचे पारडे स्पष्टपणे जड असल्याचे दिसून येते. अंदाजे भाजपला ५, शिवसेना (शिंदे गट) २, राष्ट्रवादी (अजित पवार गट) १ आणि महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र राष्ट्रवादीकडे असलेल्या अतिरिक्त मतांमुळे महायुतीकडून अतिरिक्त उमेदवार दिला गेल्यास निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**'कोटा'चे गणित निर्णायक**

विधान परिषद निवडणुकीत एका उमेदवाराला विजयी होण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. सध्या महायुतीकडे एकूण २३४ आमदारांचे संख्याबळ असल्याने त्यांच्या ८ उमेदवारांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीचे संख्याबळ सुमारे ४९ असल्याने त्यांना एक जागा निश्चित मिळेल, मात्र दुसऱ्या जागेसाठी आवश्यक मतांची जुळवाजुळव करणे कठीण दिसत आहे.

**विधानसभा संख्याबळाची आकडेवारी**

राज्यातील सध्याचे पक्षनिहाय संख्याबळ या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. भाजपकडे १३१, शिवसेना (शिंदे गट) ५७, राष्ट्रवादी (अजित पवार गट) ४० आमदार आहेत. तर काँग्रेसकडे १६, राष्ट्रवादी (शरद पवार गट) १०, शिवसेना (ठाकरे गट) २० आमदार असून समाजवादी पक्षाचे २ आमदार आहेत. याशिवाय काही लहान पक्ष आणि अपक्ष आमदारांचे मतही निर्णायक ठरू शकते.

**निवडणुकीत रंगत येण्याची शक्यता**

महायुतीचे संख्याबळ भक्कम असले तरी अतिरिक्त उमेदवारी, नाराजी आणि संभाव्य क्रॉस-व्होटिंगमुळे निवडणुकीत अनपेक्षित वळण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः काही नाराज आमदारांची भूमिका आणि पक्षांतर्गत रणनीती यामुळे अंतिम निकालावर परिणाम होऊ शकतो.

दरम्यान, १२ मे रोजी होणाऱ्या मतदानाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून या निवडणुकीतून आगामी राजकीय समीकरणांची दिशा स्पष्ट होणार आहे.

# महाराष्ट्र रेड झोनमध्ये!

## राज्यात उष्माघाताचे 3 बळी?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या पाऱ्यामुळे महाराष्ट्र तापला आहे. अगदी कोकणापासून ते विदर्भापर्यंत उन्हाच्या तीव्र झळांनी जीव कासावीस होत आहे. सर्वाधिक 44 अंश तापमान असलेल्या अकोल्यामध्ये रिक्षामध्ये एकाचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. तर हिंगोली मध्ये शेख रफिक शेख उस्मान या 30 वर्षे तरुणाचा बसस्थानक परिसरात मृत्यू झाला आहे. तर वाशिममधील नर्सरीमध्ये 45 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा अंदाज आहे. वाढत्या तापमानामुळे आरोग्य यंत्रणाही सतर्क झाली आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये 'कोल्ड रूम' आणि पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून देण्यात आला आहे.



राज्यातील २७ जिल्ह्यांना अति-उच्च उष्णतेचा धोका आहे. ९ जिल्ह्यांना उष्णतेचा जास्त धोका आहे. ७६ टक्के लोकसंख्येला उष्णतेचा धोका आहे. वाढत्या उष्णतेमुळे राज्याचा आपत्ती व्यवस्थापन विभागही सज्ज झाला असून त्यानुसार एसओपी पण जाहीर करण्यात आली आहे.पुढील 4 दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवलीये.कुठल्या जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट आहे पाहूया...

**या ९ जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट-**

1. सांगली 2. सोलापूर 3. संभाजीनगर 4. जालना 5. परभणी 6. हिंगोली 7. अकोला 8. अमरावती 9. वर्धा

# शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे धरणे अंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष ज. मो अभ्यंकर साहेब यांच्या आदेशाने व राज्य सरचिटणीस रमेश चौगुले सर यांच्या मार्गदर्शनाखाली खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यासाठी पुनम गेट येथे धरणे अंदोलन करण्यात आले .



खाजगी प्राथमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे समयोजन तात्काळ करावे,दुरुस्तीसाठी पाठवलेले सेवकसंच तातडीने दुरुस्त करणे,प्रलंबित सेवकसंच जनरेट करणे,पटपडताळणी परीक्षेच्या कालावधीत करु नये,वेतन दरमहा एक तारखेला अदा करा,बीएलओ च्या कामातुन शिक्षकांची मुक्तता करणे,थकीत वेतन देयकाचा निपटारा करा या मागण्यासाठी जिल्हा परिषदेसमोरील पुनम गेट येथे धरणे अंदोलन करण्यात आहे.या मागणीचे निवेदन सामान्य प्रशासन विभागातील प्रशासनाधिकारी स्मिता पाटील प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अर्जुन वाघमारे, यांना देण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे जिल्हा सरचिटणीस गोपी राठोड, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे कार्याध्यक्ष वल्लभ चौगुले, माध्यमिक शहराध्यक्ष बिभीषण शिरसाठ, प्राथमिकचे शहराध्यक्ष सोमनाथ गायकवाड, जिल्हा महिला अध्यक्ष ज्ञानेश्वरी संगीत राव, डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण,युवक शिक्षक संघटनेचे आप्पाराव इटेकर,अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेचे अ.गफुर अरब, शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे प्रसाद मसरे, अंबादास चव्हाण शुभांगी निंबाळकर, संगीता भोसले, मुरलीधर कडलासकर, नारायण पवार, बरगली लांडगे, काशिनाथ बडुरे, उल्हास बिराजदार, बसवेश्वर जुंदळे, आदी उपस्थित होते.

डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, युवक शिक्षक कर्मचारी संघटना, शिवछत्रपती शिक्षक संघटना, अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटना,राज्य प्राथमिक शिक्षक महासंघ आदी संघटनांनी या अंदोलनाला पाठींबा दिला.

# गावच्या विकास निधीसाठी आता ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र अनिवार्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने आता स्मशानभूमींच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. ज्या गावांमध्ये स्मशानभूमीचे काम पूर्ण झाले आहे, त्यांनाच इतर विकासकामांसाठी जिल्हा परिषदेकडून निधी दिला जाणार आहे. यासाठी संबंधित गावाच्या ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र आता बंधनकारक करण्यात आले आहे.



ग्रामविकास विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून विकासकामांचा प्रस्ताव सादर करताना ग्रामसेवकांकडून दोन प्रकारची प्रमाणपत्रे घेतली जातील, त्यात गावात स्मशानभूमी उपलब्ध आहे.

त्यामुळे इतर विकासकामांना निधी मिळावा आणि गावात स्मशानभूमी नसेल, तर पहिल्यांदा स्मशानभूमीसाठीच निधी मिळावा, अशीही प्रमाणपत्रे असतील. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहात आमदारांनी केलेल्या तक्रारींची दखल घेत हा निर्णय घेतला आहे.

प्रत्येक गावात स्मशानभूमीसाठी २० लाख रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १२० ग्रामपंचायतींमध्ये अद्याप स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नाही. या गावांना निधी देताना आता स्मशानभूमीच्या कामालाच प्राधान्य दिले जाईल.

ज्या गावांमध्ये स्मशानभूमीच्या जागेवरून न्यायालयीन वाद सुरू आहेत, त्याबाबत जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून तातडीने तोडगा काढला जाणार आहे. केवळ स्मशानभूमीच नव्हे, तर तिथे जाणारा रस्ता, पाण्याची सोय आणि वृक्षारोपण यांसारख्या सोयींसाठीही विशेष निधी दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# नुतन सिईओ कुशल जैन यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापतींकडून स्वागत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे स्वागत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. जिल्हा परिषदेच्या



यशवंतराव चव्हाण सभागृहात आज नुतन जिल्हा परिषद व सभापती यांचेसाठी प्रशिक्षणाचे आयोजन यशदा पुणे व जिल्हा परिषदेच्या वतीने करणेत आले होते. या प्रसंगी सिईओ कुशल जैन यांनी भेट दिलेनंतर सर्व जिल्हा परिषदेच्या वतीने सिईओ कुशल जैन यांचे पदाधिकारी यांनी स्वागत केले. प्रसंगी यशदा चे उप महासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मी विकास यात्री पुस्तक देऊन सिईओ जैन यांचे स्वागत केले. या प्रसंगी शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील , उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ उपस्थित होते. जिल्हा परिषदेचे सदस्य यांनी नुतन सिईओ कुशल जैन यांना भेटून संवाद साधून स्वागत केले.

# मतदारसंघाच्या नव्या पुनर्रचनेच्या आरखाड्यानुसार होणार मतदारसंघाच्या सीमांमध्ये बदल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा व विधानसभेची सन 2029 मध्ये होणारी निवडणूक ही मतदारसंघाच्या नव्या पुनर्रचनेच्या आरखाड्यानुसार होणार असून, त्यासाठी मतदारसंघाच्या सीमांमध्ये बदल होणार आहे.



राजकीय नेत्यांची धाकधूक वाढली आहे. नवा मतदारसंघ कसा असणार याची उत्सुकता लागली आहे. त्यासाठी अजून दोन वर्षांचा अवकाश असला तरी आतापासूनच राजकीय समीकरणाचा अंदाज लावण्याच्या प्रयत्नात आहेत. लोकसभा, विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत प्रशासकीय स्तरावर प्राथमिक हालचाली सुरू झाल्याची चर्चा सुरू आहे.

अद्याप परिसीमन आयोग अधिकृतरीत्या स्थापित झालेला नसला, तरी 2026-27 मध्ये त्याची स्थापना होऊन 2029 ची लोकसभा निवडणूक नव्या आराखड्यानुसार पार पडू शकते, अशी शक्यता आहे. प्रशासकीय वर्तुळातील चर्चेनुसार लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना करताना भौगोलिक सलगता आणि प्रशासकीय सोय यांना प्राधान्य दिले जाणार आहे. मतदारसंघांची नवी आखणी करताना केवळ लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता भौगोलिक परिस्थिती, दळणवळणाची सोय आणि मतदारांचा लोकप्रतिनिधींशी सुलभ संपर्क या बाबींवर भर दिला जाणार आहे. प्रशासकीय कामकाजात अडथळे येऊ नयेत म्हणून विसंगत भौगोलिक भाग एकत्र न करण्याची भूमिका ठेवली जात आहे. विधानसभा मतदारसंघांच्या पातळीवरही मोठे बदल अपेक्षित असून, सध्या एका तालुक्यातील गावे वेगवेगळ्या मतदारसंघांत विभागली गेल्याने निर्माण झालेली विसंगती दूर करण्याचा प्रयत्न होणार आहे. नव्या प्रस्तावानुसार, संबंधित तालुक्यातील गावे त्याच मतदारसंघात समाविष्ट करण्यावर भर राहणार आहे. सध्या ही प्रक्रिया प्राथमिक स्तरावर असली तरी संभाव्य पुनर्रचनेमुळे केवळ मतदारसंघांच्या सीमाच नव्हे, तर राजकीय समीकरणांमध्येही बदल होईल.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
-: संपर्क :-
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


वात्रटिका

**परत वाड्यात जा**

बाहेरून बोलण्यापेक्षा
जरा परत वाड्यात या...
जरा काय चालले तिथे
याचा चाकाचोळा तरी घ्या...
प्रत्येक ठिकाणी जात धर्म
शोधण्याची प्रत्येकाला घाई....
पण लक्षात का घेत नाहीत
कोणी ती असते एक बाई...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# सोलापूर जिल्ह्यात १५९० रुग्णांना सुमारे १२.८६ कोटीची मदत

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. सोलापूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अजार्चा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख ६ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

## संपादकीय

# गुणवत्ता वाढीसाठी ज्ञानातून समृद्धी

शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून सामाजिक सक्षमीकरण आणि राष्ट्रनिर्मितीसाठीचे एक प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (2020)ची प्रभावी अंमलबजावणी करणारे अग्रेसर राज्य आहे.

महाराष्ट्राने उच्च शिक्षणात दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. तंत्रशिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाचा पाया आहे.

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण अधिक सक्षम, अद्ययावत आणि उद्योगक्षम होत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020च्या प्रभावी अंमलबजावणीसह, बहुविद्याशाखीय शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे आणि इंटरनेट ऑफ थिंग्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि रोबोटिक्ससारख्या अत्याधुनिक कालसुसंगत अभ्यासक्रमांचा समावेश केल्याने तंत्रशिक्षणाला नवसंजीवनी मिळाली आहे.

या बदलांमुळे केवळ विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत नाही, तर महाराष्ट्राचा औद्योगिक आणि आर्थिक विकासही अधिक वेगाने घडतो आहे. राज्य शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन महाराष्ट्राचा उच्च शिक्षणातील महत्त्वाकांक्षी विकास आराखडा तयार केला.

तो इतर राज्यांसाठी एक आदर्श उदाहरण ठरू पाहत आहे. दृढ राजकीय इच्छाशक्ती, संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग आणि द्रष्टे नेतृत्व यामुळे भविष्यासाठी सज्ज अशी शिक्षण प्रणाली घडविण्याचे स्वप्न पाहात शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख केली जात आहे.

**आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे कॅम्पस**

परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस महाराष्ट्रात सुरू करण्यात येत आहेत. एज्युकेशन सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत, नवी मुंबई परिसरात सर्वोच्च 10 परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल तसेच भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण देशातच उपलब्ध होईल. जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव आता परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील, हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील, संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल.

विद्यार्थ्यांना एक्स्चेंज प्रोग्राम, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील आणि प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य 2029पर्यंत साध्य करण्यासाठी हा एक महत्त्वाचा घटक ठरेल.

शैक्षणिक सुविधा लोकाभिमुख व्हाव्यात या उद्देशाने देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत एक हजार टडडड माध्यमातून प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (एनईपी-2020) अंतर्गत भारतीय ज्ञानप्रणाली जेनेरिक हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण ऑनलाइन शिक्षण सहज एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**मुलींना मोफत उच्चशिक्षण**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे आणि मुलींना संधी उपलब्ध होण्यासाठी आर्थिकदृष्ट्या मागास (ईबीसी), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) व इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील पात्र विद्यार्थिनींना महाविद्यालयीन शिक्षणासाठीचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या संपूर्ण रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वार्षिक उत्पन्न 8 लाख किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या मुलीचे पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत देण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2023-24च्या तुलनेत शैक्षणिक वर्ष 2024-25मध्ये जवळपास 53 हजार 444 एवढी मुलींची संख्या वाढली आहे.

**एईडीपी अभ्यासक्रम**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (एईडीपी) अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. यामुळे अध्ययन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण यांच्यामध्ये असलेली दरी कमी करून शिक्षण आणि उद्योग यांच्यात संवाद निर्माण करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत, उद्योग क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कौशल्य आधारित अभ्यासक्रम तयार केले गेले आहेत. अप्रेंटिसशिपमध्ये प्रत्यक्ष कामावर आधारित शिक्षण आणि सिद्धान्तिक ज्ञान यांचा समावेश करण्यासाठी सर्व कृषी विद्यापीठे आणि पात्र ठरणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून लागू केले आहेत.

**सीईटी परीक्षेसाठी अटल उपक्रम**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून घेण्यात येणाऱ्या सीईटीसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रथमच CET-ATAL (Assess-ment Test and Learning) Mock Test and Psychometric Test Module सुरू करण्यात आले आहे. या मॉड्युलचा फायदा उमेदवारांना त्यांच्या अभ्यासक्रमाच्या सामायिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचा सराव करण्यासाठी होत आहे. तसेच यामुळे विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सामायिक प्रवेश परीक्षा देतानाचा आत्मविश्वास वाढत आहे.

राज्यातील पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांसाठी यावर्षी विद्यार्थ्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून, 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी आतापर्यंत 1 लाख 3 हजार 115 विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. मागील दहा वर्षांतील हा सर्वोच्च आकडा असून, प्रवेशाची टक्केवारी तब्बल 93 टक्क्यांवर पोहोचली आहे. दहावीनंतरचे पदविका अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांसाठी रोजगार व उच्च शिक्षणाचा उत्तम पर्याय ठरत असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डाटा सायन्स, रोबोटिक्स यांसारखे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती मोहिमा, उद्योगक्षेत्राशी सामंजस्य करार आणि स्वयंअध्ययन मूल्यांकन यांसारख्या उपक्रमांमुळे विक्रमी प्रतिसाद मिळाला.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना 60 टक्के अनुदान वाढ तसेच दर्जा वाढ करण्यात आली आहे. केवळ एका क्लिकवर राज्यातील 12 हजार ग्रंथालयांना तत्काळ अनुदान मिळत आहे. भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भक्कम पावले टाकली जात असून, शिक्षण क्षेत्राला ज्ञानाधिष्ठित, कौशल्याधारित आणि जागतिक स्पर्धेस सक्षम बनवण्याचा निर्धार केला आहे.

वसुधैव कुटुंबकम या तत्त्वज्ञानाचा हा शैक्षणिक आविष्कार असून, महाराष्ट्राची शैक्षणिक वाटचाल केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी माझे योगदान देत आहे, विद्यार्थ्यांनो, तुम्हीच देशाचे आणि महाराष्ट्राचे भविष्य आहात. कठोर परिश्रमांच्या माध्यमातून ज्ञान अर्जित करा आणि एक सशक्त व समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी सज्ज व्हा.

# आमदार-खासदार,मंत्री यांना सरकार पगार, पेन्शन,भत्ते देऊ शकते; तर ईपीएस-९५ पेंशन धारकांना किमान ७५०० रुपए पेंशन का देऊ शकत नाही?

भा १७ मार्च २०२६ ला एका संसदीय समितीने ईपीएस-९५ पेंशनधारकांना निवृत्तीवेतन किमान ७५०० रुपए करावे याकरिता सरकारकडुन समिती स्थापन करण्यात आली याचे काय झाले ते सरकार सांगायला तयार नाही.परंतु महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभेतील ५४३ वरून ८५० खासदार करण्याची घाई सरकारला जास्तच पडली असल्याचे दिसून येते.परंतु ईपीएस-९५ पेंशनच्या महत्त्वपूर्ण शिफारशीचे काय झाले हे सांगायला सरकार तयार नाही.गेल्या १२ वर्षापासून ईपीएस-९५ पेंशन धारक किमान पेन्शन ७५०० रुपए मिळावे यासाठी सतत आंदोलन करून ही बाब सरकारच्या व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत आहे तरीही सरकार ईपीएस-९५ पेंशनधारकांकडे दुर्लक्ष करीत आहे.या गंभीर आणि जटील समस्येकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या १२ वर्षापासून पेंशनचा मुद्दा तसाच रखडलेला आहे आणि या अल्पशा पेंशनने त्रस्त होऊन अनेक पेंशन धारकांना आपले प्राण सुध्दा गमवावे लागले.ईपीएस पेंशन धारकांची गंभीरता लक्षात घेऊन या निवृत्तीवेतनाच्या संदर्भात गेल्या १२ वर्षापासून अनेक खासदारांनी प्रत्येक अधिवेशनात वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले आणि करीत असतात व त्यावर अनेक चर्चा सुध्दा झाल्यात आणि होतात सुध्दा.परंतु या सर्व चर्चावर सरकारकडुन ठोस निर्णय होत नसल्याने संपूर्ण चर्चा फोल ठरून फक्त "चर्चेत पे चर्चा" रहाल्या आणि यांवर सरकारकडून कोणतेही ठोस पाऊल उचलल्याचे दिसले नाही.गेल्या १२ वर्षापासून वृध्द पेंशनधारक अनेक आंदोलने करीत आहे व सरकारसोबत चर्चा करीत आहे परंतु यातून काहीच साध्य झाल्याचे दिसत नाही. परंतु या अधिवेशना अंतर्गत पेंशन धारकांच्या आशा उंचावल्या होत्या. केंद्राच्या कर्मचारी निवृत्तीवेतन योजना १९९५ (ईपीएस) अंतर्गत सध्या मिळणाऱ्या एक हजार रूपयांच्या किमान मासिक निवृत्तीवेतनाचा तातडीने आणि सर्वसमावेशक फेरआढावा घेण्याची शिफारस एका संसदीय समितीने मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६ ला केली.वाढत्या महागाईच्या काळात निवृत्तांना दिलासा देण्यासाठी निवृत्तीवेतन अधिक वास्तववादी आणि सन्मानजनक पातळीवर नेण्याची गरज व्यक्त करतांना ते दरमहा किमान ७५०० रुपए करावे अशी महत्वपूर्ण शिफारस या समितीने केली आहे.किमान मासिक पेन्शन साडेसात हजार रुपये करावे या मागणीसाठी निवृत्तीवेतनधारकांनी ९ मार्चपासून जंतरमंतर येथे तीन दिवसांचे आंदोलन केल्याच्या पार्श्वभूमीवर कामगार, वस्त्रोद्योग आणि कौशल्यविकासविषयक संसदीय स्थायी समितीने केलेली ही शिफारस लक्षणीय मानली जाते.परंतु सरकारने ईपीएस -९५ पेन्शन बद्दल कोणतीही ठोस निर्णय घेतलेला नाही.असे वाटत होते की पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार किमान पेंशनवर ताबडतोब ठोस निर्णय घेईल. परंतु अजूनही ठोस निर्णय घेतलेला नाही.परंतु ईपीएस -९५ पेन्शन धारकांसाठी स्थापन केलेली संसदीय समितीच्या माध्यमातून पाच विधानसभा निवडणुकीच्या आधी निर्णय लागेल अशी आशा लाखो पेन्शन धारकांना होती.आज महागाईमुळे देशातील कामगारवर्ग त्रस्त आहे याचे पडसाद आपल्याला आंदोलनाच्या माध्यमातून देशभरात पहायला मिळते तरीही सरकारला अजून पर्यंत जाग आलेला नाही. महागाईमुळे कामगारांचे किती हाल बेहाल होत आहे याचे जिवंत उदाहरण नोएडा,मानेसर (पंजाब), फरिदाबाद,(भिवडी) राजस्थान येथे नुकतेच आंदोलनादरम्यान दिसून आले. कामगारांचे आंदोलन एकुण ८३ ठिकाणी झाले आणि या आंदोलनात तब्बल ४२ हजार कामगार सहभागी झाले होते. यावरून आपण समजू शकतो की महागाईमुळे कामगारांचे किती हाल होत असतील आणि गंभीर समस्यांचा सामना करावा लागत असावा.सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक कंपन्यांमध्ये कामाचे १२ तास झाल्याचे दिसून येते. यानूसार त्यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्याचे वेतन मिळत नाही.त्यामुळे त्यांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला व सरकार कामगारांसमोर झुकले.पुढेचालुन हेही कामगार पेंशन धारक होणार आहेत याचाही विचार सरकारने करने गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशात अनेक कंपन्यांनमध्ये कामाचे १२ झाल्याचे कामगारांचा एनर्जी पॉवर सुध्दा कमी होतांना दिसत असून मोठ्या प्रमाणात मानसिक तणाव दिसून येतो.यामुळे कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना आपण पहातो.यावरून कामगार क्षेत्रातील कामगार असो अथवा पेन्शनधारक त्याने कितीही संघर्ष केला तरी सरकार त्याला कामाचा मोबदला देण्यास नेहमीच टाळटाळ करतांना दिसते. ईपीएस-९५ पेन्शन धारकांसाठी सरकारने संसदीय समिती स्थापन केली.परंतु आता शंका आहे या संसदीय समितीकडून ईपीएस पेन्शन धारकांना खरोखरच न्याय मिळेल का ?यातही शंका निर्माण होत आहे.कारण सरकारला जर कोणत्याही गोष्टीची टाळाटाळ करायची असेल तर समिती स्थापन करून आपले कपडे झटकण्याचे काम सरकार नेहमीच करीत असते. त्यामुळे ईपीएस पेन्शन धारकांसाठी तयार करण्यात आलेली संसदीय समिती हा फक्त दिखावा असल्याचे सीध्द होत आहे. सरकारला जर पेंशन धारकांची एवढीच काळजी असती तर लोकसभा अधिवेशनात किमान पेन्शन ७५०० रुपए व त्यावर महागाई भत्ता देण्याची शिफारस ताबडतोब केली असती. त्यामुळे सरकारच्या करनी आणि कथनीमध्ये जमिन आसमानचा फरक दिसून येतो. आज ईपीएस पेन्शन धारक अल्पशा पेंशनमध्ये जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही अशी गंभीर परिस्थिती आज पेंशन धारकांची झाली आहे.ज्या गोष्टीची आवश्यकता नाही त्याला सरकार जास्त प्राधान्य देताना दिसते.त्या अनुषंगाने येणाऱ्या लोकसभेत ८५० खासदार रहाणार आहेत. ही सरकारची मनमानी नाही का ? यांना मिळणारा पगार,पेन्शन, गाडी,बंगले,भत्ते हा देशावर बोजा पडणार नाही का ?या सर्व गोष्टी सरकारला माहीत असतांना सुध्दा ईपीएस पेन्शन धारकांना फक्त ७५०० रुपए पेंशन देऊ शकत नाही ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. सरकार खासदारांची संख्या वाढविण्याची दृष्टीने लोकसभेत बिल आणले आहे याचे स्वागत अशाच पध्दतीने सरकार ईपीएस-९५ पेंशनचे लोकसभेत बिल आणुन पास का करीत नाही ? असे अनेक प्रश्न आज ईपीएस पेन्शन धारक सरकारला विचारत आहे.देशात ५४३ खासदार व राज्यसभेचे २४५ खासदार, प्रत्येक राज्याचे आमदार, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक एवढा मोठा फौजफाटा देशसेवेसाठी असतांना खासदारांची संख्या वाढविण्याची सरकारला गरज का भासावी ?असा प्रश्न आज देशाची १४० कोटी जनता विचारत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारक अल्पशा पेंशनने मरत आहे ही बाब सरकारला दिसत नाही कारण डोळ्यांवर पट्टी बांधून आहे.महागाईने संपूर्ण उच्चांक गाठले, सोन्याचे भाव आभाळाला टेकले, आरोग्य सुविधा महागल्या, औषधोपचार महागले,पाण्याचे बिल वाढले, इलेक्ट्रिक बिल वाढले,घरटॅक्स वाढला तरी अल्पशा पेंशनमध्ये ईपीएस पेन्शन धारक आपला उदरनिर्वाह करीत आहे.आमदार -खासदार-मंत्री याचे पगार, पेन्शन, भत्ते वाढले.परंतु ईपीएस-९५ पेंशन धारकांचे किमान निवृत्तीपेंशन आजही फक्त हजार रुपयेच आहे.याचा सरकारने गांभीयार्ने विचार करावा आणि ताबडतोब ईपीएस -९५ पेन्शन ७५०० रुपए पेंशन व महागाई भत्ता लागू करून पेन्शन धारकांना दिलासा द्यावा ही केंद्र सरकारला माझी कळकळीची विनंती आहे. जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मराठा साम्राज्याचा नकाशा पुन्हा समाविष्ट करा

## शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेची मागणी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता आठवीच्या इतिहास पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा भौगोलिक विस्तार दर्शविणारा नकाशा वगळण्याच्या निर्णयाविरोधात शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत ठोस, अभ्यासपूर्ण आणि पुराव्यांनी समर्थित निवेदन सादर केले. संस्थापक अध्यक्ष मारुती सिंधुबाई दिगंबर सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना देण्यात आले. यावेळी अभिषेक पवार, स्वप्निल सावळगी आणि ओमसी कोंडा उपस्थित होते.

या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) यांनी घेतलेला निर्णय हा केवळ शैक्षणिक त्रुटी नसून इतिहासाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मराठा साम्राज्याचा इतिहास हा भारताच्या राष्ट्रीय स्वाभिमान, पराक्रम आणि अखिल भारतीय एकतेचा आधारस्तंभ असून, त्याचे अपूर्ण चित्र विद्यार्थ्यांसमोर ठेवणे म्हणजे इतिहासाचे विकृतीकरण असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

निवेदनामध्ये विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने उभारलेले हिंदवी स्वराज्य पुढे छत्रपती शाहू महाराज आणि मराठा सरदारांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता संपूर्ण हिंदुस्थानभर विस्तारले. दिल्लीच्या राजकारणावर प्रभाव टाकत उत्तर भारतात सत्ता प्रस्थापित करणे आणि विविध प्रांतांमध्ये आपले वर्चस्व निर्माण करणे, ही मराठा साम्राज्याची ऐतिहासिक वास्तवता असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

राजस्थानातील जयपूर, जोधपूर, मेवाड, बुंदी यांसारख्या राजपूत संस्थानांशी मराठ्यांचे संबंध, संघर्ष, तसेच चौथ आणि सरदेशमुखी (खिराज) यांसारख्या करप्रणालीद्वारे निर्माण




झालेला आर्थिक प्रभाव हे सर्व मराठा सत्तेच्या व्यापकतेचे जिवंत उदाहरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. मराठ्यांचा प्रभाव हा केवळ लष्करी नव्हता, तर तो राजकीय, आर्थिक आणि प्रशासकीय सर्व स्तरांवर होता, असे ठामपणे सांगण्यात आले.

यासोबतच विविध ऐतिहासिक पुरावे देखील निवेदनात जोडण्यात आले. दिल्ली विद्यापीठातील पीएचडी संशोधन प्रबंध 'Maratha–Rajput Relations during the Eighteenth Century' (2012) मध्ये पान क्र. 37, 38 आणि 99 वर मराठ्यांनी राजस्थानात केलेला हस्तक्षेप आणि त्यांचे वर्चस्व स्पष्टपणे नमूद आहे. तसेच 'History of Rajputan' या ग्रंथात मराठ्यांनी राजस्थानातील राजकारणावर केलेला प्रभाव सविस्तर मांडण्यात आला आहे.

ब्रिटिशकालीन अधिकृत दस्तऐवज 'Rajputana Gazetteer' (1879) मध्ये राजस्थानातील मोठा भूभाग हा सिंधिया, होळकर आणि गायकवाड यांच्या प्रभावाखाली असल्याचे स्पष्ट नमूद आहे.

त्याचप्रमाणे 'Poona Residency Correspondence' (1936) मध्ये जयपूर व जोधपूरचे राजे मराठ्यांच्या अधिपत्याखाली असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या सर्व पुराव्यांमधून मराठा साम्राज्याचा विस्तार आणि प्रभाव निर्विवादपणे सिद्ध होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

निवेदनात नकाशाचे शैक्षणिक महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. नकाशा हा इतिहास शिक्षणातील अत्यावश्यक घटक असून, तो विद्यार्थ्यांना साम्राज्याचा भौगोलिक विस्तार, प्रभावक्षेत्र आणि ऐतिहासिक वास्तव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे नकाशा वगळणे म्हणजे विद्यार्थ्यांसमोर अपूर्ण आणि संकुचित इतिहास मांडणे होय, असे स्पष्ट करण्यात आले.

इतिहास हा कोणत्याही राजकीय, वैचारिक किंवा प्रशासकीय दबावाखाली बदलता कामा नये, तो नेहमी सत्य, पुरावे आणि वस्तुनिष्ठतेवर आधारित असावा, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. इतिहासाची मांडणी करताना तज्ज्ञांचा सहभाग आवश्यक असून, अन्यथा पुढील पिढ्यांना चुकीची माहिती मिळण्याचा धोका निर्माण होतो, असा इशाराही देण्यात आला.

शेवटी प्रशासनाकडे स्पष्ट मागणी करण्यात आली की, सादर केलेल्या सर्व ऐतिहासिक पुराव्यांचा निष्पक्षपणे विचार करून मराठा साम्राज्याचा वास्तविक आणि विस्तृत नकाशा तात्काळ शालेय अभ्यासक्रमात पुनःसमाविष्ट करण्यात यावा. विद्यार्थ्यांना संपूर्ण, सत्य आणि अभिमानास्पद इतिहास देणे ही शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी असल्याचेही नमूद करण्यात आले.

निवेदनाच्या शेवटी शिवसेवक प्रतिष्ठानच्या वतीने स्पष्ट इशारा देण्यात आला की, जर या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले, तर राज्यभर व्यापक आणि तीव्र आंदोलन उभारले जाईल. त्यामुळे हा विषय आता केवळ शैक्षणिक न राहता ऐतिहासिक सत्य आणि राष्ट्रीय अस्मितेचा प्रश्न बनला असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धर्मादाय रुग्णालयाच्या वतीने गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्यात - धर्मादाय उप आयुक्त सूर्यवंशी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात 17 धर्मादाय रुग्णालय कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयांनी शासन निदेर्शानुसार सर्वसामान्य, गरजू व गोरगरीब रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य असल्याचे धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी निर्देशित केले आहे.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समितीच्या त्रैमासिक आढावा बैठकीत समितीचे सचिव धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ, धर्मादाय निरीक्षक उमेश देशमुख, भागवत फुलसुंदर यांच्यासह समिती सदस्य व धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धर्मदाय उप आयुक्त सूर्यवंशी पुढे म्हणाले की राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील सर्व 17 धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या गोरगरीब गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधेसह त्यांना व्यवस्थित माहिती देणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणासाठी शासनाने रुग्णालयांना मान्यता दिलेली आहे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी प्रत्येक रुग्णालयांनी करणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणासाठी त्यांना शासकीय जागा उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्या जागेचा वापर वैद्यकीय सेवा देण्यासाठीच करावा अन्य व्यावसायिक कारणासाठी याचा वापर केला जाणार नाही याबाबतची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सुचित केले.




धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्याकडील आरोग्य सेवकांना योग्य प्रशिक्षण द्यावे. त्याप्रमाणेच शासनाच्या वतीने नियुक्ती केलेल्या पाच आरोग्य सेवकांनाही ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात आलेले आहे तरी संबंधित रुग्णालयाने ह त्यांना फील वरील प्रशिक्षण द्यावे. आरोग्य सेवक व रुग्णालय यांच्यात चांगला समन्वय असला पाहिजे तसेच आरोग्य सेवकांनी रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांना उपचाराच्या अनुषंगाने तसेच त्यांनी विचारलेली सर्व माहिती व्यवस्थित सांगावी व योजनेचा क्लेम ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रासह अद्यावत तयार करून द्यावा. संबंधित रुग्णालय योजनेत असलेल्या रुग्णाकडून अतिरिक्त पैसे घेणार नाहीत याची काळजी घ्यावी असे निर्देश सूर्यवंशी यांनी दिले.

त्याप्रमाणेच प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाच्या बाहेर दर्शनी भागात संबंधित आरोग्य सेवक अथवा आरोग्य मित्र याचे नाव व संपर्क क्रमांक डिस्प्ले बोर्ड च्या माध्यमातून लावावा. तसेच त्या बोर्ड वर टोल फ्री क्रमांक तक्रार निवारण क्रमांक ही उपलब्ध करून द्यावेत. जेणेकरून तिथे येणाऱ्या गरजू रुग्णांना तात्काळ आरोग्य मित्राच्या मार्फत सर्व प्रक्रिया वेगाने पार पडता येईल. व रुग्णालयाशी संबंधित तक्रार असेल तर तेही नोंदवता येईल. पुढील पंधरा दिवसात हे डिस्प्ले बोर्ड प्रत्येक रुग्णाला बाहेर लावले जातील याची खात्री महसुल यंत्रणेने करावी, अशा सूचना सूर्यवंशी यांनी दिल्या.

सर्व धर्मादाय रुग्णालयामध्ये शासन निदेर्शाप्रमाणे आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत का नाहीत याबाबतची तपासणी संबंधित प्रांत अधिकाऱ्यांच अध्यक्षतेखाली एक पथक तयार करून करण्यात येईल. या पथकामध्ये तहसीलदार, आरोग्य अधिकारी यांचाही समावेश केला जाईल. हे पथक रुग्णालयांची तपासणी करून त्याचा अहवाल एका महिन्यात देईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी समिती सदस्य तसेच धर्मादाय रुग्णालयांच्या प्रतिनिधी यांनीही त्यांच्या अडचणी तसेच रुग्णालयामार्फत रुग्णांना चांगली सेवा देण्याबाबत ची माहिती दिली.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अ‍ॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सिंहगड पब्लिक स्कूलचा दहावी सीबीएसई निकाल १००%; गुणवत्तेची परंपरा कायम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), नवी दिल्ली यांनी नुकताच दहावीचा निकाल जाहीर केला असून, सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज (सीबीएसई), केगाव, सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे.

यंदा शाळेतून एकूण ७७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. सर्वच विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले. यापैकी १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले, तर ३६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. तसेच १६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश मिळवले.

निकालात विक्रांत पवार (९५.२०%) याने प्रथम क्रमांक पटकावला. राजवीर गुंड (९४.४०%) द्वितीय, तर प्रमेघ भोसले (९३.४०%) तृतीय क्रमांकावर राहिले.

या यशाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निखहत शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कंत्राटी पध्दतीने सफाईगार पदाची पदभरती

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर या कार्यालयात 6 महिन्याच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने अर्धवेळ 11 महिन्यासाठी सफाईगार पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत कार्यरत बेरोजगार संस्थांकडून विनानिवीदा मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

- काम देणाऱ्या कार्यालयाचे नाव :- मा. सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर
- आवश्यक पदाचे नाव :- अर्धवेळ सफाईगार
- पदाची संख्या :- 1
- कुशल / अकुशल :- अकुशल

तरी जिल्ह्यातील कार्यरत असणाऱ्या तसेच उपरोक्त पदांची सेवा पुरविण्यास इच्छुक असणाऱ्या बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थांनी आपले दरपत्रक व इच्छापत्र दिनांक 21 एप्रिल 2026 पर्यंत दुपारी 5 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र श्रीमती संगीता खंदारे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पार्क चौक, नॉर्थकोट, सोलापूर येथे प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्रमांक. 0217 – 2992956 द्वारे संपर्क करावा.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कौशल्य विकास विभागाकडून निबंध स्पर्धा

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांसाठी आपले आयुष्य समर्पित करून समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. त्यांचे कार्य केवळ एका निबंधात मांडणे शक्य नाही. त्यामुळे आंबेडकर यांनी महिलांविषयी केलेले कार्य महिला साक्षमीकरणात त्यांनी दिलेले योगदान या विषयावर ही निबंध स्पर्धा होणार आहे.

**स्पर्धेचे स्वरूप**

या स्पर्धेत पहिल्या गटात शासकीय आयटीआय, खाजगी आयटीआय, तसेच आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. तर विषयासाठी विद्यार्थ्यांना ५००ते ८०० शब्दांची मयार्दा निश्चित करण्यात आली आहे.

दुसरा खुला गट असून यात राज्यातील सर्व महिला आणि पुरुष सहभागी होऊ शकतात या गटाला ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटाला निबंध केवळ मराठी भाषेत सादर करावा लागणार आहे. स्पर्धेचा कालावधी १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ हा निश्चित करण्यात आला आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे स्पर्धक ९१५२२३०१९३ या मोबाईल क्रमांकाशी संपर्क करू शकतात. त्याचबरोबर या स्पर्धेच्या नोंदणीसाठी क्यू आर कोड ही देण्यात आला आहे. नोंदणी केल्यावर स्पर्धकांना त्याची पोच ही मिळणार आहे.

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्ये आणि नेतृत्वगुण विकसित करण्यावर भर दिला जात आहे. तसेच उत्कृष्ट निबंधांना पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशस्तीपत्र ही दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य विकास अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# आंबेडकर जयंती निमित्त बार्शीत संविधान वाचन




**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्रीमंत शिवसुर्य बहुद्देशीय प्रतिष्ठान बार्शी, संचलित शिवसेवा वाचन संस्कृती बार्शी तर्फे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त संविधान वाचन करून या महामानवाना आदरांजली वाहण्यात आली.श्री कृष्ण मंदीर उपळाई रोड येथे याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सई वुमन्स हॉस्पीटलचे डॉ. कुमार जगताप तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.विवेक गजशिव , सामाजिक कार्यकर्ते सुमित खुरंगळे, पत्रकार चंद्रकांत करडे, गणेश भोळे ,उत्तम पोतदार, शिवराज्य सेनेचे हर्षवर्धन पाटील, नगरसेवक आकाश राऊत, रणजीत पाटील, सूर्या मस्के, जाणीव फाउंडेशनचे उपाध्यक्ष वसंत मामा हवालदार, ग्रंथपाल विनोद गायकवाड हे उपस्थित होते. सुरुवातीला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अतुल पाडेसर यांनी केले. या नंतर समीक्षा जमदाडे हिने संविधान वाचन केले. यानंतर सर्वच विद्यार्थ्यांना महापुरुषांचे पुस्तके भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शनाचे काम उदयकुमार पोतदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रितम मोरे,गणेश पवार, राज सदावर्त,राज जगताप, वेदांग पाडे यांनी परिश्रम घेतले.

# सलग १४ वर्षे १००% निकाल, इंडियन मॉडेल स्कूलची परंपरा कायम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दरवर्षीप्रमाणेच या वर्षीसुध्दा इंडियन मॉडेल स्कूलने यशाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रु.-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० वी सी.बी.एस.ई. बोर्डाच्या परीक्षेचा इंडियन मॉडेल स्कूलचा निकाल १००% लागला आहे. इ.१० वीची ही १४ वी बॅच होती. या शाळेने १००% निकालाचे सातत्य सलग १४ वर्षे राखले आहे.

यावर्षी एकूण १८४ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८० विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. तर ०७ विद्यार्थ्यांनी ८९.००% एवढे गुण मिळवले आहेत.अपूर्वा कोरे ही विद्यार्थिनी ९८.६०% घेऊन शाळेत प्रथम आलेली आहे.श्रीजा जोगदंड ही ९८.००% घेऊन शाळेतून दुसरी आलेली आहे. तर संस्कृती देशमुख व राजवीर साहू हे विद्यार्थी ९७.४०% घेऊन शाळेत तृतीय आलेले आहे. संस्कृती जाधव ९७.२०% घेऊन प्रशालेतून चतुर्थ आलेली आहे तर ईशा भोसले ९७.००% गुण घेऊन प्रशालेतून पाचवी आलेली आहे.

इंग्लिश या विषयात प्रज्ञेशा कवचाळे हीने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. मराठी या विषयात ईशा भोसले, संस्कृती साठे, समृध्दी आदलिंगे,धैर्य गोरे, समृध्दी जगताप या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. सोशल सायन्स या विषयात सिमरन बलदवा या विद्यार्थिनीने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विज्ञान या विषयामध्ये प्रतिथ काळे व रतन देशपांडे या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत. हिंदी या विषयात श्रीजा जोगदंड या विद्यार्थिनीने १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत. गणित या विषयामध्ये अपूर्वा कोरे हीने १०० पैकी ९८ गुण प्राप्त केले आहे. या शिवाय ०७ विद्यार्थ्यांनी ८९% मिळवत यश प्राप्त केलेले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष प्रा.ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, समन्वयक ममता बसंवती, अचला राचर्ला, सुजाता बुट्टे,आदिती कुलकर्णी, मानसी जोशी, रुही काझी व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# माळेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात



**कन्हेरगांव (कटूसत्य वृत्त):-** माळेगांव तालुका माढा येथील लोंढे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त 14 एप्रिल 2026 रोजी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसह माजी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. शेतकरी नृत्य, लावणी, कोळीगीत, रिमिक्स गीते तसेच एकांकिका यांद्वारे विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बबन किर्ते होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेच्या सदस्य सविता कोकाटे उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना जिल्हा परिषद सदस्या सविता कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ताविकासावर भर देत उज्ज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्वेता मस्के, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल लोंढे, उपाध्यक्ष अमोल खरात, सर्व सदस्य, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी तसेच भीम जयंती कमिटीचे अध्यक्ष सुदर्शन लोंढे व सदस्य, माजी विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

सूत्रसंचालन सुप्रिया लोंढे, हिम्मत किर्ते यांनी तर आभार सहशिक्षक जोगदंड यांनी मानले.

# बेंबळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** बेंबळे (ता. माढा) : भारतरत्न यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बेंबळे येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

या कार्यक्रमानिमित्त विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रसिद्ध वक्ते संतोष शिंदे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समाधान सलगर, पोलीस पाटील बिभीषण किर्ते सर, तसेच बौद्धाचार्य दत्तात्रय किर्ते यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडले.

यावेळी ह्याडॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीह्याची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी अभिमान किर्ते, उपाध्यक्षपदी विद्याधर किर्ते यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. तसेच इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली.

कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य पोपट तात्या अनपट, सरपंच विजय तात्या पवार, कैलास दादा भोसले, मनु आबा पवार, सोसायटी चेअरमन माऊली पवार, लक्ष्मण गळगुंडे भाऊसाहेब, माजी पोलीस पाटील माणिक किर्ते, ग्रामपंचायत सदस्य दिपक किर्ते, नामदेव कांबळे, विश्वजीत भाऊ भोसले, अनिल दादा अवताडे, अतुल भैय्या अनपट, बबलू काळे, किशोर कदम, खंडू कांबळे सर, दादा लोंढे, अशोक काळे, अशोक देवकर, पोपट अवताडे, मदन क्षीरसागर, यश भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच मंडळाचे कार्यकर्ते शुभम किर्ते, मरिचंद्र किर्ते, रोहित किर्ते, अभिजित भैय्या किर्ते, अभिजित दादा किर्ते, आनंद ताकतोडे, गणेश कांबळे, भैय्या ताकतोडे, अमोल किर्ते, साहिल किर्ते, नवनाथ किर्ते, किशोर ताकतोडे, नागनाथ किर्ते, उमेश कांबळे, योगेश किर्ते, सौरभ किर्ते आदींची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बिभीषण किर्ते सर यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, सामाजिक एकजूट आणि बाबासाहेबांच्या विचारांप्रती आदराची भावना प्रकर्षाने जाणवली.

# पक्ष बळकटीकरणाला सर्वोच्च प्राधान्य : डॉ. श्रीकांत शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** राज्यात पुढील तीन वर्षात निवडणुका होणार नसल्याने या कालावधीत पक्ष विस्तार आणि संघटना बळकटीकरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना दिले.

सोमवारी गांधीनगर येथील हेरिटेज मंगल कार्यालयात आयोजित बैठकीत डॉ. शिंदे यांनी सोलापूर, माढा आणि धाराशिव लोकसभा मतदारसंघांचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीस मंत्री उदय सामंत, गुलाबराव पाटील, खासदार धैर्यशील माने, खासदार डॉ. ज्योती वाघमारे, चंद्रहार पाटील, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भगीरथ भालके, अनिल सावंत यांची उपस्थिती होती.

शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर संपर्कप्रमुखांना फिल्डवर उतरवण्यात आले असून, लोकसभा व जिल्हानिहाय बैठका घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर व पुणे येथील आढाव्यानंतर आता सोलापूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्येही संघटनात्मक स्थितीचा आढावा घेतला जात आहे.

पुढील टप्प्यात जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गण तसेच महापालिका वॉर्डनिहाय बैठका घेण्यात येणार आहेत. या माध्यमातून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाणार आहे.

शिवसेनेची ताकद गावागावात वाढली पाहिजे, शाखा विस्तार झाला पाहिजे आणि प्रत्येक पदाधिकारी सक्रिय आहे का, याची सखोल पडताळणी केली जाईल, असे डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच, लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमधील यशानंतर आगामी जिल्हा परिषद निवडणुकांतही पक्ष पूर्ण ताकदीने उतरवला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संपर्कप्रमुखांच्या दौऱ्याचा सविस्तर अहवाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात येणार असून, या माध्यमातून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार शिवसेना नेतृत्वाने व्यक्त केला आहे. आगामी काळात तळागाळातील कार्यकर्त्यांना अधिक सक्रिय करण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) वेलकम चित्रपटातील सहनायक अभिनेता २) नाकाने हुंगण्यासाठी केलेले तंबाखूचे चूर्ण ३) उशीर (हिंदीत) ४) महाराष्ट्राचे माजी वनमंत्री (फक्त आडनाव) ५) लहान खड्डा ६) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते ७) जोराने मारलेली आरोळी ११) फटाक्यांची माळ १६) मोजण्याचे प्रमाण १८) कर्नाटकातील एक जिल्हा २०) लग्नामध्ये नवऱ्या मुलाकडील मंडळींना उतरण्यासाठी दिलेली जागा २२) कामधंदा न करणारा २३) जोराचे रणकंदन २५) एकनाथ खडसेंचा जिल्हा ३१) बैलाच्या मानेमागील उंचवटा ३२) फॅक्टरी मराठीत ३३) टाकाऊ कागद ३४) व्याजाने पैसे देणारा ३६) केस कापणे ३९) विषमच्या विरूध्दार्थी ४०) एक शाकाहार - *** भात ४१) पं.नेहरूंनी दिलेली घोषणा - *** हराम है ४४) एक म्हण- ** करी काम ४६) दुनिया, विश्व ४७) अभिषेक

**आडवे शब्द :** १) लातूरचे युवा नेते ६) मोदी सरकारने खरेदी केलेले लढाऊ विमान ८) पंख (हिंदीत) ९) जलस्त्रोत, पाण्याचा कॉक १०) सल उलट लिहा १२) मुलगी (हिंदीत) १३) अजय देवगणचा एक चित्रपट १४) छोटी मोटारगाडी १५) विष्णूपत्नी, लक्ष्मी १७) महाभारतातील दुर्योधनाची आई १९) नायक चित्रपटातील टीव्ही रिपोर्टर अभिनेत्री - ** बात्रा २१) कुटुंब २४) आधार देणे २६) धावपटू (इंग्रजीत) २७) सबब, प्रयोजन २८) वाऱ्याचा झंजावात २९) नाव (हिंदीत) ३०) धुलीवंदन (ग्रामीण भाषेत) ३२) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा ३४) प्रामाणिक, खरा ३५) तोंडातील दातांची समूहरचना ३७) बेडकाचा आवाज ३८) स्पेशल, विशेष ४०) प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळ्या पिवळ्या गाड्या (ग्रामीण भाषेत) ४२) बदामाप्रमाणे एक सुका मेवा ४३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारा शब्द ४५) समोरासमोर झालेली नजरभेट ४८) पाठीचा कणा यापासून बनलेला आहे ४९) दु:ख (हिंदीत) ५०) पहिलवान शब्द थोडक्यात असा लिहितात- *

## सुडोकु - 228

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# शाश्वत विकास ध्येय विकासाच्या कृतीसाठी जिल्हा परिषद सदस्यांनी पुढाकार घ्यावा - उपमहासंचालक डॉ. कलशेट्टी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शाश्वत विकास ध्येय विकासाच्या कृतीसाठी जिल्हा परिषद सदस्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले आज जिल्हा परिषद च्या यशवंतराव चव्हाण सभागृहात नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समितीचे सभापती यांच्यासाठी एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाजकल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीचे सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिणकर, यशदाचे उपसंचालक आनंद पुसावळे, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी नृसिंह मित्रगोत्री, उपसंचालक वित्त रमेश लिदडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांचेसह जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समितीचे सभापती व खातेप्रमुख हे प्रमुख उपस्थित होते. प्रास्तविक व स्वागत उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी केले. प्रशिक्षणाचे सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. या प्रशिक्षणासाठी कक्ष अधिकारी सचिन साळुंखे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, साप्रवि मधील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### अधिकारी व कर्मचारी यांचेशी समन्वय साधा- माजी सभापती बुट्टे पाटील

जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघाचे आदर्श नियोजन या विषयावर शरद बुट्टे पाटील यांनी जिल्हा परिषद सदस्यांना मार्गदर्शन करून सदस्यांनी अधिकारी व कर्मचारी यांचेशी समन्वय साधून काम करावा. भांडणात वेळ घालवून विकास कामांवर परिणाम होऊ देऊ नका. अभ्यास करून अधिकारी यांचेशी चर्चा करा असे आवाहन केले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार पाठीमागील बाकावर..! आज नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्यांसाठी आयोजित प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष व सभापती चेतनसिंह केदार, कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी सभागृहांचे पाठी मागील खुर्चीवर बसून प्रशिक्षण घेतले. प्रमुख पदाधिकारी यांनी दाखविलेली नम्रता आज चचेर्चा विषय होता.

### स्वच्छता दूत म्हणून काम करण्याचा निर्धार करा - डॉ. कलशेट्टी

स्वच्छता दूत म्हणून काम करण्याचा निर्धार करा असे आवाहन डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, १५ वा वित्त आयोगात ६० टक्के रक्कम पाणी व स्वच्छता व इतर ४० टक्के रक्कमेचे आराखड्यात नियोजन करा. स्वच्छतादूत म्हणून काम करा. प्लास्टिक हटवा. प्लास्टिक पुनर्वापर करा. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान प्रभावी राबवा. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. शाश्वत विकास ध्येय आपण सर्वांनी स्वीकारलेले या संकल्पनाचे मतदारसंघ न्याय नियोजन करावे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या प्रत्येक मुद्द्यावर डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मार्गदर्शन केले तरी तसेच प्लास्टिक व्यवस्थापन यावर देखील मार्गदर्शन करून त्यांनी स्वच्छतेसाठी पुढाकार घेण्याची आवाहन जिल्हा परिषद सदस्य यांना केले. सिईओ कुलदीप जंगम यांचे विनंतीनुसार या प्रशिक्षणाचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी १५ वा व १६ वा वित्त आयोगातील बंधित व अबाधित निधीच्या मार्गदर्शक सुचनांची माहिती सदस्यांना द्यावी अशी मागणी केली. या प्रसंगी सभापती अमृता वाघे यांनी मनोगत व्यक्त केले. उपसंचालक आनंद पुसावळे यांनी सोप्या भाषेत जिल्हा परिषद व पंचायत समिती सभेच्या कामकाजाची माहिती दिली.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमातील महत्त्वाच्या तरतुदी व जिल्हा परिषद व पंचायत समिती रचनेबाबत माजी मुख्य कार्यकारी अधिकारी नृसिंह मित्रगोत्री यांनी मार्गदर्शन केले.

# डॉ. बाबासाहेबांना माणनारे जास्त; जाणनारे कमी झाल्याने चळवळ थंड़ावली : प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्मचारी सेवक वर्ग, राजकारण, समाजकारण आणि साहित्य अशा सर्व विभागात उभी राहिलेली दलित चळवळ डॉ. बाबासाहेब आम्बेडकरी विचारांवर चालणारी विवेकवादी व लढाऊ चळवळ होती. दलित पैंथर ही एकाच वेळी राजकीय नेते आणि साहित्यिक घडविनारी चळवळ होती. रेल्वे, बीएसएनएल, पोस्ट , शिक्षक अशा सर्व सरकारी क्षेत्रातील मागासवर्गीय कर्मचार्यांच्या संघटनानी स्वताच्या पगारीतील पैसे खर्च करून संघटना उभ्या केल्या आणि वाढविल्या होत्या. ज्यानी दलितांच्या प्रश्नावर आवाज उठविला. पण अलिकडच्या काळात विद्यापीठ नामांतर आणि खैरलांजी प्रकरणानंतर आम्बेडकरी चळवळ ठंड़ावल्याचे दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे चळवळीत डॉ. बाबासाहेबांना माणनारे जास्त झालेत आणि माणनारे कमी झालेत, अशी खंत लातूर येथील प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांनी केले.



येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन समिति सोलापूरच्या वतीने वसुंधरा महाविद्यालायात आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेतील "आंबेडकरी चळवळः ऐतिहासिक वाटचाल, सद्यस्थिती, आव्हाने व पर्याय " या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख होते. तर समितीचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, मनीष सुरवसे, प्रा. एम आर कांबळे हे विचारमंचावर उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, ज. वि. पवार यांनी डॉ. आम्बेडकरोत्तर चळवळ यावर पाच खंड लिहिले. यावर प्रतिक्रिया देताना नामदेव ढसाळ यांनी आंबेडकरोत्तर वगैरे असे काही नसते. फक्त आंबेडकरच असते, असे म्हटले होते. आंबेडकरी विचार हा सर्वकालीन विचार आहे, जो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षापासून सुरु झाला आणि आजही ती सुरु आहे. रिपाई सुरु झाली आणि त्यातील भंडारे नावाचे लढवय्ये कार्यकर्ते कॉंग्रेस मध्ये गेले. चळवळीतील कार्यकर्त्यांनी आपल्याला सोडून गेलेल्याचा राग धरण्या ऐवजी भंडारे यांनी बाजी मारली अशा शब्दात कौतुक केले. त्यानंतर रूपवते, बी. सी. काम्बले, दादासाहेब गायकवाड़ अशी फुटिरांची रांग लागली. विशेष म्हणजे त्यांचेही त्यांनी बाजी मारली असे कौतुक होत असतानाच दलितातील क्रांतिकारी कार्यकर्त्यांनी दलित पैंथर नावाची संघटना जन्माला घातली. तिचा इतका दबदबा होता की दलित विरोधी माणूस आंबेडकर चौकातुन पुढे जायला घाबरायचा. पुढे हिचा दबदबा संपला पण ती ही फुटली. नन्तर मा. कांशीराम यांनी बसपा उभी केली. 1989 ला ते राजीव गांधी या पंतप्रधानाच्य विरोधात अमेठीत लढले. ते हरल्यावर त्यांना विचारले गेले कि हरणार हे माहित असतानाही तुम्ही का लढले. तेव्हा ते म्हणाले की बापू के बच्चे के खिलाफ भी बाबा का बच्चा लड़ सकता है, ये मुझे कार्यकताओं को दिखाना था! हा बाणा चळवळीतुन गेला आहे. व सारे शिलेदार धर्मान्ध शक्तीच्या बाजूने गेला आहे. कुणी थेट फडणवीस यांच्या सोबत तर कोण एकनाथ शिंदे यांच्या साथीने युतीत आहे. लॉन्ग मार्च काढनारे कवाड़ेही त्यांच्या सोबत मांडीला मांडी लाऊन आहेत आणि कविता लिहिणारे आठवलेही. थॉट्स ऑफ पाकिस्तान या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात की, धर्मान्ध शक्ती सत्तेतच येऊ नये म्हणून प्रयत्न करणे आवश्यक आहे, सांगतात आणि आपल्या चळवळी नेमके उलटे करीत आहेत. वामन दादा कर्डक लिहितात की, भीम माज्यात होता.. माज्यातला भीम मीच केला ऊणा.. दोष देऊ कुणा.. अशी आजची अवस्था असून धर्मान्ध शाक्तिना रोखने हेच आंबेडकरी चळवळीपुढील मुख्य आव्हान असल्याचे ते म्हणाले.

प्रारंभी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व स्वामी विवेकानंद प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने करण्यात आले. प्रा. डॉ. सुहास उघडे यांनी प्रास्ताविक केले. मनीष सुरवसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रीकृष्ण कोळी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रशांत गायकवाड यांनी आभार मानले.

यावेळी प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण, प्रा. डॉ. एम. डी. शिंदे, शंकर पाटील, प्रा. अरुण सोनकांबळे, दत्ता थोरे, प्रा. सुवर्णा कांबळे, निजामोद्दीन शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

# पालखी सोहळ्यात वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच रस्ते दुरुस्ती, स्वच्छतेला प्राधान्यः जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 25 जुलै 2026 रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, उपलब्ध करून देण्याबरोबरच रस्ते दुरुस्ती, शौचालय सुविधा व स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली. आषाढी यात्रेच्या पुर्व तयारीच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे , उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर,



तहसीलदार सचिन लंगुटे, , जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधधिक्षक डॉ. सरडे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने, व्यवस्थापक प्रविणकुमार घम तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस म्हणाले, पालखी सोहळा आणि सर्व भाविकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. यासाठी सार्वजनीक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी आवश्यक तात्काळ पाहणी करुन रस्ते दुरुस्ती बाबतची कार्यवाही करावी. पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा याठिकाणी भाविकांना पुरेशा शौचालय सुविधा व मुबलक पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करावे. स्वच्छतेसाठी अधिकचे मनुष्यबळ व आवश्यक यंत्रणाची उपलब्धतेबाबत नियोजन करावे. अन्न औषध प्रशानाने पालखी मार्गावरील तसेच शहरातील व परिसरातील खाद्य पदार्थांच्या दुकानांची तपासणी करावी. तसेच पदार्थांची तपासणी करुन तात्काळ अवहाल प्राप्तीसाठी फुड सेफ्टी ऑन व्हील या मोबाईल व्हॅनची संख्या वाढवण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच भेसळ व विषबाधा होऊ नये यासाठी जनजागृती करण्याचे नियोजन करावे.

तसेच सुरक्षेसाठी वाखरी, भक्ती सागर (65 एकर) , वाळवंट, दर्शन मंडप, दर्शन रांग, मंदीर व परिसर, प्रमुख रस्ते ठिकाणी सीसीटीव्ही कार्यान्वित करुन एकाच ठिकाणी ऑपरेटींग सिस्टीम करण्याबात नियोजन करावे. वारी कालावधीत खाजगी हॉस्पिटलचे दहा टक्के बेड रिकामे ठेवण्याबात आरोग्य विभागाने आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी दिल्या. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आषाढी यात्रेत प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबतची सविस्तर माहिती पीपीटीद्वारे दिली यामध्ये पालखी सोहळे येण्याचे मार्ग मुक्कामाचे व विसाव्याचे ठिकाण व त्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा बाबतची माहिती दिली. तसेच वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (65 एकर) वाळवंट, दर्शन रांग, दर्शन मंडप येथे प्रशासन व मंदिर समितीकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

# बेंबळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- बेंबळे (ता. माढा) :** भारतरत्न यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बेंबळे येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

या कार्यक्रमानिमित्त विविध मान्यवरांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रसिद्ध वक्ते संतोष शिंदे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समाधान सलगर, पोलीस पाटील बिभीषण किर्ते सर, तसेच बौद्धाचार्य दत्तात्रय किर्ते यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडले.



यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती' ची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी अभिमान किर्ते, उपाध्यक्षपदी विद्याधर किर्ते यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. तसेच इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली.

कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य पोपट तात्या अनपट, सरपंच विजय तात्या पवार, कैलास दादा भोसले, मनु आबा पवार, सोसायटी चेअरमन माऊली पवार, लक्ष्मण गळगुंडे भाऊसाहेब, माजी पोलीस पाटील माणिक किर्ते, ग्रामपंचायत सदस्य दिपक किर्ते, नामदेव कांबळे, विश्वजीत भाऊ भोसले, अनिल दादा अवताडे, अतुल भैय्या अनपट, बबलू काळे, किशोर कदम, खंडू कांबळे सर, दादा लोंढे, अशोक काळे, अशोक देवकर, पोपट अवताडे, मदन क्षीरसागर, यश भगत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच मंडळाचे कार्यकर्ते शुभम किर्ते, मरिचंद्र किर्ते, रोहित किर्ते, अभिजित भैय्या किर्ते, अभिजित दादा किर्ते, आनंद ताकतोडे, गणेश कांबळे, भैय्या ताकतोडे, अमोल किर्ते, साहिल किर्ते, नवनाथ किर्ते, किशोर ताकतोडे, नागनाथ किर्ते, उमेश कांबळे, योगेश किर्ते, सौरभ किर्ते आदींची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बिभीषण किर्ते सर यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, सामाजिक एकजूट आणि बाबासाहेबांच्या विचारांप्रती आदराची भावना प्रकर्षाने जाणवली.

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये 'संवेद २०२६' स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचा यशस्वी समारोप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** 'संवेद २०२६ या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनमधून आम्हाला शहरातील नागरी समस्यांवर अनेक अभिनव आणि व्यवहार्य उपाय मिळाले आहेत. या कल्पनांची अंमलबजावणी करून शहरातील सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ.ह्व असे विचार सोलापूरचे महापौर विनायक कोंडयाल यांनी व्यक्त केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या सहकायार्ने आयोजित 'संवेद २०२६' या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनमधील अंतिम प्रकल्पांचे प्रदर्शन व पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रसंगी ते बोलत होते. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमात देशभरातील उच्च शिक्षण संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानिमित्ताने सोलापूर शहरातील नागरी समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले. हॅकाथॉनमधील अंतिम फेरीतील संघांनी १५ एप्रिल रोजी आपले प्रकल्प सादर केले, तर १६ एप्रिल रोजी विद्यापीठ परिसरात प्रकल्पांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले. आज या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभ सोलापूरचे माननीय महापौर विनायक कोंडयाल, सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मा. अच्युत गोडबोले, प्रा. कृष्णा वेदुला,



प्रा. विल्यम ओक्स, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी आणि संचालक राघवेंद्र एम. चाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे म्हणाले 'महानगरपालिकेच्या वतीने आम्ही विद्यार्थ्यांनी शहरातील नागरी समस्यांवर सुचवेलेल्या उपाययोजना आणि संकल्पनांचे स्वागत करतो. पुढील सहा महिने ते एका वर्षाच्या कालावधीत त्यांचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष क्षेत्रीय प्रकल्पांमध्ये रूपांतर करण्यास आम्ही उत्सुक आहोत. यासाठी आम्ही आवश्यक ते आर्थिक, पायाभूत आणि मनुष्यबळाचे साहाय्य देण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना सहा महिन्यांच्या इंटर्नशिपची संधी देखील उपलब्ध करून देऊ.'

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपळकृष्ण जोशी म्हणाले, 'विद्यापीठ म्हणून आम्ही विद्यार्थ्यांना समस्या-निवारक म्हणून घडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. 'हॅकाथॉन' हा आजच्या जेन-झी'ला (Gen Z) समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. या हॅकाथॉनमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपायांची गुणवत्ता आणि नाविन्यता अत्यंत उल्लेखनीय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यांसोबत, प्रत्यक्ष समस्या समस्यांवर उपाय शोधण्याचा दृष्टीकोण विकसित होत आहे.' या कार्यक्रमास महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह इतर प्रशासकीय अधिकारी, विद्यापीठाचे कुलसचिव प्राणेश मुरनाळ, डॉ. प्रभा कसलीवाल, डॉ. दर्शन रुईकर, डॉ. आनंद शिंपी उपस्थित होते. याशिवाय सोलापूर मधील औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, देशाच्या विविध राज्यातील शिक्षण संस्थांमधील सहभागी संघांचे विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक तसेच एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातील अधिष्ठाता, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या हॅकाथॉनमध्ये सोलापूर महानगरपालिकेने शहरातील वाहतूक व पार्किंग व्यवस्थापन, रस्त्यांची स्थिती, पाणी वितरण, स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि डेटा-आधारित सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या नागरी समस्यांचा समावेश केला होता.

विद्यार्थ्यांनी या समस्यांवर तंत्रज्ञानाधारित, व्यवहार्य आणि प्रभावी उपाय सादर करून आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला. या उपक्रमात देशातील १० राज्यांमधून २७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, एकूण ५४६ संघांनी नोंदणी केली. तज्ञांच्या मूल्यमापनानंतर ७५ संघांची निवड करण्यात आली व त्यांना मार्गदर्शनासह प्रोटोटाइप विकसित करण्याची संधी देण्यात आली. अंतिम फेरीत २५ उत्कृष्ट संघांनी प्रवेश मिळवला.

या हॅकाथॉनमध्ये बंगळुरू येथील आर.व्ही कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या 'टीम ॲक्वाबाइटने' प्रथम तर नवी मुंबई येथील एसआयइएस ग्रॅजुएट स्कूल ऑफ टेक्नॉलजीच्या 'टीम सुपरनोवा' यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम विजेत्यांना रुपये दोन लाख (२,००,०००) आणि द्वितीय क्रमांकासाठी एक लाख रुपयांचे (१,००,०००) रोख पारितोषिक प्रशस्तिपत्रकासह देण्यात आले. तसेच नवी मुंबई येथील फ्रां.सी. रोड्रिग्स इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची 'टीम आयओटीयन्स', एनआयआयटी राजस्थानची 'टीम किलोबाईट' आणि हुबळी येथील केएलई टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटीची 'टीम हायड्रो-ऑप्स' या तीन संघांना प्रत्येकी पन्नास हजारांचे (५०,०००) उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

याशिवाय रुपये पंचवीस हजारांचे स्पेशल ज्यूरी अवॉर्ड हुबळी येथील केएलई टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटीच्या 'टीम गॉड-डॅम' ला देण्यात आले.

या हॅकाथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे विविध शाखांतील विद्यार्थ्यांचा आंतरशाखीय सहभाग, शैक्षणिक व औद्योगिक तज्ज्ञांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष नागरी समस्यांवर आधारित आव्हाने. MathWorks तज्ज्ञांकडून आयोजित MATLAB कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यात आणि प्रोटोटाइप विकासात लक्षणीय वाढ झाली. संवेद २०२६ हा उपक्रम शासन, शिक्षण आणि उद्योग यांच्यातील प्रभावी समन्वयाचे उदाहरण ठरला असून, विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांमधून स्मार्ट आणि शाश्वत शहरी विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

# दहावी CBSE बोर्ड परिक्षेत ऑर्किड स्कूलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सीबीएसई माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून सोलापूर शहरातील सीबीएसई पॅटर्न मध्ये नावलौकिक प्राप्त नागेश करजगी ऑर्किड स्कुलने विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये स्कुलमधील कु.आरुषी उत्सुरगे ९९.६०%, यशराज भोसले ९९% ,पलक छाजेर ९८.८%, ओंकार मेहता ९८% ,वरद बिनगे ९७.८%, इरफान पठाण ९७.६%, पूर्वा कोचर ९७.४%, मानसी मोरे ९७.४ %, अनिशा बंडगुल ९७.२%, दिव्या चव्हाण ९६.४%, प्रथमेश गुंड ९६.२%, अमानअली शेख ९५.४%, आर्या चंडक ९५.४% यांनी उत्कृष्ट गुण मिळवून यश




संपादन केले आहे. तसेच इंग्रजी, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान व मराठी विषयात एकूण ३९ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.

३१ विद्यार्थ्यांनी ९०% हून अधिक गुण मिळविले आहेत, तसेच ७३ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८०% गुण मिळविले आहेत. एकूण १२७ विद्यार्थ्यांनी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण होवून शाळेच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्राचार्या रुपाली हजारे व सर्व शिक्षकवृंद तसेच पालकांनी परिश्रम घेतले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार दादा करजगी ,सचिवा वषातांई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी अभिनंदन केले.

# सोलापूरात 24 मे रोजी राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर पालक परिचय मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरात दहावा राज्यस्तरीय धनगर समाज वधू-वर पालक परिचय मेळावा रविवार दिनांक 24 मे 2026 रोजी सुंदर मल्टीपर्पज हॉल नेहरूनगर बस स्टॉप शेजारी विजापूर रोड, सोलापूर येथे आयोजित केला असल्याची माहिती संस्थेचे सदस्य भाऊसाहेब चोरमले यांनी माहिती दिली.

या मेळाव्यामध्ये इच्छुक वधू-वरांची नाव नोंदणी मोफत असून घटस्फोट, विधवा, विदुर व सर्व शाखेतील समाज बांधवांनी नोंदणी करावी. समाज बांधवांनी आपल्या पाल्यांचा व नातेवाईकांच्या पाल्यांची दिनांक 20 एप्रिल 2026 पर्यंत नोंदणी करावी. नोंदणी करीता रविंद्र नागणकेरी, संस्थापक अध्यक्ष (मो क्र. (9421041213) अध्यक्ष सुहास गडदे, (मो. क्र.9420490725) कार्याध्यक्ष उदय कुमार ठेंगले, (मो. क्र.9552586615) यांच्याशी संपर्क साधावा.

सदर मेळाव्याचे मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सुरुवात होईल. मेळाव्याच्या ठिकाणी समाज बांधवांना स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. सदर मेळावा सकाळी 10 ते दुपारी 3 वाजेपर्यंत असेल. समाज बांधवांनी 20 एप्रिल पर्यंत आपल्या पाल्याची नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे